MHSO110014282024

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५१०/२०२४</u>**

अभिमान मैंदाड विरुध्द विनोद काळे वगैरे३

**<u>निशाणी क्र. ११ वरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यानी त्यांच्या विरुध्द सदरहु दाव्यात कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी अशी विनंती करते की, दाव्याची नोटीस प्राप्त झालेनंतर ते वकीलामार्फत हजर झाले. परंतु त्यानंतर प्रतिवादी क्र २ व ३ यांना वयोमानाने अनेक प्रकारचे आजार जडलेले असल्याने त्यांचेवर दवाखाना औषधोपचार करणेची नैतिक जबाबदारी प्रतिवादी क्र १ यांचेवर असल्याने प्रतिवादी क्र १ यास दाव्याच्या कामी आवश्यक ती माहिती घेवून ती वकीलांना देता आली नाही, त्यामुळे प्रतिवादी यांचे वतीने मुदतीत कैफियत व म्हणणे देणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांनी म्हणणे व कैफियत देणेस जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांचे म्हणणे व कैफियत न स्विकारलेस प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे म्हणुन अर्ज.

३. वादी तर्फे विव्दान वकीलांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवुन अर्जास आक्षेप नोंदविला. ते असे नमुद करतात की, अर्ज बेकायदेशीर आहे. त्यातील मजकूर व कारणे मोघम स्वरुपाची व चुकीची दिलेली आहेत. सदर नमुद कारणांना कोणताही पुरावा दिलेला नाही. सबब, सदरचा अर्ज रदद होण्यास पात्र आहे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाचे ठरेल. सदर प्रतिवादी यांनी सदरहु अर्जासोबत त्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व त्यामध्ये कैफियत दाखल करण्यास जाणुनबुजून उशिर केलेला

नाही असे कथन केले आहे. माझ्या मते उपरोक्त प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तरी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंबामुळे प्रतिवादी यांच्यावर जास्तीत जास्त दंड लादणे योग्य होईल. याउलट त्यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

०१ प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब त्यांच्यावर खर्च लादुन मंजुर करण्यात येतो.

०२ प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी एकत्रीत खर्च रक्कम रु. ५००/- (रूपये पाचशे फक्त) वादींना देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2025.09.08 17:48:54 +0530

दिनांक : ०८/०९/२०२५

(एम.जे.गायकवाड)
४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
माळशिरस, ता.सोलापूर